# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मल्हार साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १७४ आणि १७५, चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा सी / बी हेवी मोलॅसिस/शुगरकेन ज्यूस/सिरप/ग्रेन्स यांच्यावर आधारित १५०.० केएलडी रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादन करण्यासाठी १५०.० केएलपीडी आसवणी प्रकल्प स्थापन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मल्हार साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १७४ आणि १७५, चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा सी / बी हेवी मोलॅसिस/शुगरकेन ज्यूस/सिरप/ग्रेन्स यांच्यावर आधारित १५०.० केएलडी रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादन करण्यासाठी १५०.० केएलपीडी आसवणी प्रकल्प स्थापन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक, ०५ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी १२.३० वाजता प्रस्तावित प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास मंगळवार, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८५ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९३०-एफटीएस-००१२९ दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

श्री अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर तथा सदस्य, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. सदस्य, आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारांवर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

सदस्य, आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री अजित पाटील यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मल्हार साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १७४ आणि १७५, चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा सी / बी हेवी मोलॅसिस/शुगरकेन ज्यूस/सिरप/ग्रेन्स यांच्यावर आधारित १५०.० केएलडी रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादन करण्यासाठी १५०.० केएलपीडी आसवणी प्रकल्प स्थापन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याविषयी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्राथमिक मान्यता (TOR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०८-०५-२०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास केंद्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ११-०५-२०२१ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र संचार यात मराठीत व इंग्रजी भाषेत तसेच राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत रविवार दिनांक ०५-०९-२०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व सूचना नोंदविण्यासाठी शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सोलापूर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सोलापूर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय-माळशिरस, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूर, ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, मोजे - चांदापुरी, निमगांव, खुडुस, कुसमोड, झंजेवाडी, गोरदवाडी, तरंगफळ, गारवड तालुका -माळशिरस, जिल्हा-सोलापूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये ४०.८ कोटी आहे. तर प्रक्रिया व देखभाल खर्च रुपये ३०५.०० लाख एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

१) **श्री नीतीन काकासाहेब जाधव,राहणार-चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | त्यांनी लेखी निवेदन आणले होते, ते त्यांनी वाचताना सांगितले की कारणे विनंती अर्ज करतो की सन १९९६-१९९७ मध्ये जमिन दिल्या होत्या. त्या जमिनीशेजारी माझी जमिन आहे. गट १७४ यामध्ये ०.५१आर क्षेत्र आहे तसेच गट नं. १६३/१ एकूण क्षेत्र | प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की सादरीकरण करताना यातील ब-याच मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यात सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज आहे हे सांगितलेले आहे. प्रकल्प प्रवंतक |

| | | |
|---|---|---|
| | ४ हेक्टर ९२ आर आहे. त्यात द्राक्ष बागेचे पीक आहे व बँकेचे काढून पीक घेतले आहे. त्यामुळे प्रदूषणामुळे बाग नाही आली तर बँक कर्ज कसे फेडणार. बँक कर्ज नाही फिटल्यास बँक आमच्या शेतीचा लिलाव करु शकते. तर लिलाव झाल्यावर आमच्यावर आत्महत्याची व उपासमारीची वेळ येणार आणि त्याशिवाय व शेतीशिवाय पर्याय नाही. तरी हा प्रकल्प होऊ नये ही विनंती. आणि गट १७४ यामध्ये ०.५१आर क्षेत्र आहे, (कारखाना गट क्र. 174 व 175 या क्षेत्रात उभारणार आहे म्हणून गट क्र. 174 मधील ०.५१आर क्षेत्र सदर कारखाना माझ्याकडून अद्याप विकत घेतलेले नाही. माझा सदर प्रकल्पाला विरोध आहे. | सल्लागाराने प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन केला- कारखान्यातील निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही ही अट भारत सरकारने सर्व आसवणी प्रकल्पांना घातलेली आहे असे उत्तर दिले. तसेच आवश्यक ती हवां प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल. आपला मुख्य मुद्दा पुढील प्रमाणे आहे - गट क्र. 174 मधील ०.५१आर क्षेत्र कारखान्याने तुमच्याकडून अद्याप विकत घेतलेले नाही. सदर प्रकल्पाला विरोध आहे अशी नोंद इतिवृतांत घेतली जाईल. |

२) <u>श्री गणपत महादेव शिंदे, राहणार-चांदापुरी, ता.-माळशिरस, जिल्हा - सोलापूर (त्यांच्यावतीने सुरेश गणपत शिंदे, राहणार- चांदापुरी, यांनी प्रश्न विचारला की)-</u>

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | त्यांचा लेखी अर्ज आहे. त्यांनी वाचून दाखविले की त्यांची दोन्हीही गटात जमिन आहे. १७४ मध्ये ३८ गुंठे आणि पोटखराब १४ गुंठे. १७५ मध्ये एक हेक्टर ६० आर आणि पोटखराब १८ गुंठे आहे. दोन्हीही क्षेत्रात द्राक्षे आणि डाळिंब बागा आहेत. या प्रदूषणामुळे बागा नष्ट होऊन गंभीर प्रश्न निर्माण होईल. म्हणून आमचा या प्रकल्पास विरोध आहे. | प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने प्रकल्प प्रर्वतक सल्लागाराने प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात मुद्दा क्र. १ च्या उत्तरात नमुद केल्याप्रमाणे आहे.तसेच आपला मुद्दा पुढील प्रमाणे नमुद आहे - गट क्र. १७४ मध्ये ३८ गुंठे आणि पोटखराब १४ गुंठे व १७५ मध्ये एक हेक्टर ६० आर आणि पोटखराब १८ गुंठे आहे, कारखान्याने तुमच्याकडून अद्याप विकत घेतलेला नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | सदर प्रकल्पाला विरोध आहे अशी नोंद इतिवृतांत घेतली जाईल. |
| 2 | कारखान्याचे संचालक मंडळ हे पूर्णपणे एका कुटुंबाचे असू शकते काय? | या मुद्दयाला पुढीलप्रमाणे उत्तर दिले की हा कारखाना पुर्णतः खाजगी आहे, त्यामुळे कुटुंबातीलच सर्वच व्यक्ती कारखान्याच्या कार्यकारिणीवर/चेअरमन व संचालक पदावर असू शकतात. |

३) **<u>श्री जगन्नाथ हनुमंत शिंदे, राहणार-चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-</u>**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | चा लेखी अर्ज आहे. त्यांनी वाचताना सांगितले गट नं. १७५ मध्ये वर्षा जगन्नाथ शिंदे, म्हणजे आमच्या घरच्यांच्या नावाने शेती आहे. त्यांनी अर्ज वाचून दाखविताना सांगितले की कारणे विनंती अर्ज की मौजे-चांदापुरी येथील खातेदार असून माझा गट नं. १७५ मध्ये क्षेत्र १ हेक्टर ६० आर पोटखराब १८ गुंठे, डाळिंब ऊस पीक आहे. हे पीक उभारणी करण्यासाठी बँकेचे कर्ज घेतलेले आहे. तरीपण हे बँकेचे कर्ज़ आमच्याकडून परत न झाल्यास आमच्या अडचणीत वाढ होईल. तरीही सदरहू प्रकल्पामुळे आमच्या शेतीत अडचणी येऊ शकतात. तरी या प्रकल्पास आमचा विरोध आहे. | प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने प्रकल्प प्रर्वतक सल्लागाराने प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात मुद्दा क्र. १ च्या उत्तरात नमुद केल्याप्रमाणे आहे.तसेच आपला मुद्दा पुढील प्रमाणे नमुद आहे - गट नं. १७५ मध्ये क्षेत्र १ हेक्टर ६० आर पोटखराब १८ गुंठे, आहे, कारखान्याने तुमच्याकडून अद्याप विकत घेतलेले नाही. सदर प्रकल्पाला विरोध आहे अशी नोंद इतिवृतांत घेतली जाईल. |

४) **<u>श्री दादासाहेब चंद्रकात जानकर, राहणार-तरंगफळ, ता.-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-</u>**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | त्यांनी तोंडी विचारले की हा प्रकल्प किती दिवसात चालू होईल? | सदर मुद्दयाला असे उत्तर दिले की, पर्यावरण अनुमती व म.प्र.नि. मंडळाचे |

| | | |
|---|---|---|
| | | संमती पत्र प्राप्त झाल्यानंतर साधारणतः सुमारे दोन वर्षात कारखाना कार्यान्वित होईल असे सांगितले. |
| 2 | कारखान्यात स्थानिकांना रोजगाराची संधि देताना प्राधान्य द्यावे. | या बाबत सांगण्यात आले की नियमाप्रमाणे, स्थानिकांनाच प्रकल्पात प्राधान्य दिले जाईल. |
| 3 | कारखाना चालू होण्यास आमची काहीही हरकत नाही. | कारखाना चालू होण्यास आमची काहीही हरकत नाही, याची नोंद इतिवृत्तात घेतली जाईल. |

५) **<u>श्री तानाजी उत्तम जगदाळे, राहणार-चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-</u>**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | त्यांनी तोंडी विचार मांडताना सांगितले की सदर नियोजित आसवणी प्रकल्पाच्या जवळच मे. चांदापुरी साखर कारखाना नावाचा कारखाना कार्यान्वित आहे. हा चांदापुरी साखर कारखानाच आम्हांला प्रदूषणामुळे जड झालेला आहे. कारण मी त्याच्या मागे राहण्यास आहे. चांदापुरी साखर कारखाना चालू असताना बगॅस हा अंगावर, कपड्यांवर पडतो. येथे आता शेतीला कमी क्षेत्र राहिले आहे. म्हणून सदर नियोजित आसवणी प्रकल्पाला (मल्हार कारखाना) माझा विरोध आहे. | प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की सादरीकरण करताना यातील ब-याच मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यात सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज आहे हे सांगितलेले आहे. प्रकल्प प्रर्वतक सल्लागाराने आवश्यक ती हवा प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन केला- कारखान्यातील निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही ही अट भारत सरकारने सर्व आसवणी प्रकल्पांना घातलेली आहे असे उत्तर दिले. तसेच आवश्यक ती हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल. |

६) **श्री भगवान ज्ञानू शिंदे, राहणार- चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | त्यांनी लेखी अर्ज दिल्याचे सांगितले. सदस्य, आयोजक यांनी त्यांना त्याचा लेखी अर्ज बैठकीत वाचण्यास सांगितले. अर्ज वाचताना सांगितले की १९९६-९७ ला आम्ही जमिनी विकल्या होत्या, कारखाना होण्यासाठी. मात्र त्यांनी खालील बाजूस कारखाना चालू केला. त्यावेळी आम्हांला परत जमिन देण्याचे तोंडी आश्वासन देण्यात आलेले होते. आम्ही अत्यंत कमी पैशात जमिनी दिल्या. वैयक्तिक मला पैसेही मिळाले नाहित. आता अचानक कळले की येथे आसवणी प्रकल्प - मल्हार कारखाना करणार आहेत.<br>यावेळी बैठकीत श्री पांढरे यांचे दोन लेखी अर्ज सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. श्री साधू रामा पांढरे आणि सदाशिव सुखदेव पांढरे अशी माहिती देण्यात आली. | प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने प्रकल्प प्रवर्तक सल्लागाराने प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात मुद्दा क्र. १ च्या उत्तरात नमुद केल्याप्रमाणे आहे.<br>श्री साधू रामा पांढरे आणि सदाशिव सुखदेव पांढरे यांचे लेखी अर्ज इतर आक्षेपांसोबत एकत्रितरित्या समितीस पाठविले जातील. तसेच आपला मुद्दा पुढील प्रमाणे नमुद आहे - श्री. सदाशिव सुखदेव पांढरे यांची गट नं. १७४ मध्ये 0.5 व श्री. साधु रामा पांढरे गट नं १७४ मध्ये 1 हेक्टर 78 आर , आहे, कारखान्याने तुमच्याकडून अद्याप विकत घेतलेले नाही. सदर प्रकल्पाला विरोध आहे अशी नोंद इतिवृतांत घेतली जाईल. |

७) **श्री दत्तू गणपत वाघमोडे, राहणार-माळशिरस, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पात कच्चा माल म्हणून लागणारे अन्न माळशिरसमधून घेणार आहेत काय किंवा बाहेरुन घेणार आहेत? | धान्य माळशिरसमधूनच घेणार का यास उत्तर देताना सांगण्यात आले की जर कारखान्याला जर कच्चा माल जवळून मिळत असेल, तर कारखान्याचा खर्च वाचेल व फायदाच होणार आहे. स्थानिकांचाही फायदा होईल. |

| | | |
|---|---|---|
| 2 | प्रदूषणाचा स्थानिकांना काहीही त्रास/अडचण येऊ नये. | प्रदूषणाचा काही त्रास होणार नाही. |

८) **श्री प्रशांत तानाजी वाघमोडे, राहणार-तरंगफळ, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| | त्यांनी प्रश्न विचारला की ऊसाला दर किती देणार? | ऊसाच्या दराबाबत बोलताना सांगितले की ऊसाचा दर हा बाजारभावानेच मिळणार. |
| | पैसे किती दिवसात देणार? | लवकरात लवकर पैसे देण्याचा प्रयत्न केला जाईल. |
| | धान्य फक्त माळशिरस तालुक्याचेच घेणार काय? | धान्य माळशिरसमधूनच घेणार का यास उत्तर देताना सांगण्यात आले की जर कारखान्याला जर कच्चा माल जवळून मिळत असेल, तर कारखान्याचा खर्च वाचेल व फायदाच होणार आहे. स्थानिकांचाही फायदा होईल. |

९) **श्री सतिश काकासाहेब जाधव, राहणार- चांदापुरी, तालुका-माळशिरस-**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | येथे द्राक्ष क्षेत्र आहे. त्यांनी विचार मांडताना सांगितले की सदर मल्हार कारखान्याच्या नियोजित आसवणी प्रकल्पाच्या जवळच मे. चांदापुरी साखर कारखाना नावाचा कारखाना कार्यान्वित आहे. हा चांदापुरी साखर कारखानाच आम्हांला प्रदूषणामुळे जड झालेला आहे.<br>कार्यरत चांदापुरी साखर कारखान्याच्या सांडपाण्यामुळे माझे दोन एकर क्षेत्राचे बरेच नुकसान झालेले आहे. आता अजून नवीन कारखाना आला तर माझे नवीन ७-८ एकर क्षेत्र जे द्राक्षाचे आहे. तेही खराब होईल. तरी माझे सर्वच नुकसान होईल. त्यासाठी लक्ष देण्यात यावे. | प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल व त्याच्या देखभालीबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल. व प्रदूषण होणार नाही याची देखील काळजी घेतली जाईल. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की सादरीकरण करताना यातील ब-याच मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यात सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज आहे हे सांगितलेले आहे. प्रकल्प प्रर्वतक सल्लागाराने आवश्यक ती हवा प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन केला- कारखान्यातील निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन |

| | | |
|---|---|---|
| | | त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही ही अट भारत सरकारने सर्व आसवणी प्रकल्पांना घातलेली आहे असे उत्तर दिले. तसेच आवश्यक ती हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल. |

१०) **श्री पांडुरंग कोडिंबा पांढरे,** <u>राहणार- चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-</u>

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| | ७४ शेजारीच आपली द्राक्षबाग पाच एकरची आहे. ती समोर दिसते. मी येथे राहतो. नवीन कारखान्यामुळे अडचण निर्माण होतील. | प्रश्न क्र. ९ व 10 सारखाच असल्याने, मुद्दा क्र. ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उत्तर दिले. |

११) **श्री भजनदास भगवान चोरमले,** <u>राहणार- चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा - सोलापूरः-</u>

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | १९९६-१९९७ साली नाममात्र दराने आमची जमिन कारखान्यास विकली होती. १९९७-९८ साली शेतकरी कारखान्याची निर्मिती झाली. आतापर्यंतचा अनुभव आहे की साखर कारखाना लगतची शेतक-याची शेती/जमिन ही खराब होते. आता एक कारखाना असताना, दुसरा उभा राहिला, तर आम्हांला येथून हाकलण्याचे कारस्थान आहे असे स्थानिकांना वाटते. गावातील सर्वाच्या तक्रारी असून हा कारखाना होऊ नये अशीच येथील लोकांची धारणा आहे. येथील परिसरात डोंगर व द-या असून हा परिसर कारखाना विकसित करण्यास योग्य नाही. | प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल व त्याच्या देखभालीबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल. व प्रदूषण होणार नाही याची देखील काळजी घेतली जाईल. प्रकल्प स्थानावर येण्यास रस्ता केला जाईल. सर्व ग्रामस्थांनी मुद्द्यांबाबत ग्रामपंचायतीस निवेदन दिलेली असून एक प्रत समितीस देण्यात आली. सदर निवेदन इतर आक्षेपांसोबत एकत्रितरित्या निर्णय घेणाऱ्या समितीस पाठविले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्प स्थानावर येण्यास रस्ता नाही. सर्व ग्रामस्थांनी वरिल मुद्द्यांबाबत ग्रामपंचायतीस निवेदन दिलेले असून निवदेनाची एक प्रत ग्रामपंचायतीतर्फे आपणास उपलब्ध करुन देण्यात येत आहे. (ग्रामपंचायत चांदापुरी यांनी सर्व मुद्दयाबाबत पत्र क्र. 89/2021-22 दि. 05/10/2021 अन्वये समितीस देण्यात आले.) | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की सादरीकरण करताना यातील ब-याच मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यात सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज आहे हे सांगितलेले आहे. प्रकल्प प्रर्वतक सल्लागाराने आवश्यक ती हवा प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन केला- कारखान्यातील निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही ही अट भारत सरकारने सर्व आसवणी प्रकल्पांना घातलेली आहे असे उत्तर दिले. तसेच आवश्यक ती हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल. |

<u>सदस्य, आयोजक यांनी येथे मत मांडले की, प्रस्तावित कारखाना हा साखर कारखाना नसून आसवणी प्रकल्प आहे.</u>

१२) **श्री दीपक मारुती कोपनर, पाणीपुरवठा कर्मचारी, ग्रामपंचायत चांदापुरी,मूळ गाव -चांदापुरीः-**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | श्री दीपक कोपनर, पाणी पुरवठा कर्मचारी, ग्रामपंचायत चांदपुरी यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी ग्रामपंचायतीस स्थानिक लोक, शेतकरी यांचे अर्ज आलेले आहेत. त्याअनुषगाने पंचायत समितीकडून पत्र घेऊन आलेलो आहे. श्री कोपनर यांनी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर यांना | ग्रामपंचायत चांदापुरी यांनी सर्व मुद्दयाबाबत पत्र क्र. 89/2021-22 दि. 05/10/2021 अन्वये समितीस देण्यात आले. सदर निवेदन इतर आक्षेपांसोबत एकत्रितरित्या निर्णय घेणाऱ्या तज्ज्ञ समितीस पाठविले जाईल. प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने पर्यावरण सल्लागार |

| | | |
|---|---|---|
| | पाठविलेला लेखी अर्ज बैठकीत वाचून दाखविला. अर्जात असे नमूद आहे की मेसर्स मल्हार साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १७४ आणि १७५, चांदापुरी, तालुका-माळशिरस, जिल्हा-,सोलापूर येथे सदर जो प्रकल्प चालू होणार आहे, त्याबाबत ग्रामपंचायतीकडे स्थानिक शेतकरी यांचे तक्रार अर्ज व शेतक-यांच्या द्राक्षे, डाळिंब, ऊस या पिकांचे नुकसान, त्यांचे शेतजमिनीचे नुकसानीचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. तसेच ज्याठिकाणी हा प्रकल्प नियोजित आहे, त्याच्या शेजारीच ग्रामपंचायतीने नवीन नळपाणीपुरवठा योजना मुख्यमंत्री पेयजल योजनेकडे प्रस्तावित केलेली असून ती योजना मंजूरही झालेली आहे. तरी या सर्व बाबींचा विचार होऊन ग्रामपंचायतीकडे आलेले सर्व अर्ज, तक्रारी यांचा विचार होऊन पुढील कार्यवाही व्हावी. | यांनी उत्तर देताना सांगितले की सादरीकरण करताना यातील ब-याच मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यात सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज आहे हे सांगितलेले आहे. प्रकल्प प्रर्वतक सल्लागाराने आवश्यक ती हवा प्रदूषण विषयक नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व त्याचा सारांक्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन केला- कारखान्यातील निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही ही अट भारत सरकारने सर्व आसवणी प्रकल्पांना घातलेली आहे असे उत्तर दिले. तसेच आवश्यक ती हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली जाईल. |

१३) **श्री नीतिन लोंढे, कवठेमहांकाळ, तालुका - कवठेमहांकाळ, जिल्हा-सांगली**

| क्र. | मुद्दा | उत्तर |
|---|---|---|
| 1 | सर्वसाधारणपणे या प्रकल्पास किती लोकांची आवश्यकता आहे? त्याचप्रमाणे कुशल, अकुशल कामगार किती पदावर घेणार? | एकूण ९० कामगारांचा प्रकल्पात गरज आहे व त्यातील जास्तीत जास्त कामगार स्थानिक घेतले जातील. |

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की एकंदर १३ व्यक्तींनी बैठकीत सूचना, आक्षेप नोंदविलेल्या आक्षेप धारकांची नावे वाचली.

सदर जनसुनावणीस 31 ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांची यादी (Attendance Sheet) **(सोबत सहपत्र जोडले आहे).** सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की लेखी निवेदन व त्याचे वाचन एकूण ०७ लोकांनी तर तोंडी सूचना ०६ लोकांनी केल्या. **लेखी निवेदनांची यादी - (सोबत सहपत्र जोडले आहे).**

१) इमेलद्वारे दि. 05/10/2021 श्री. मधुबाबु - हैद्राबाद,

व चांदापुरी येथील शेतकऱ्यांचे खाली नमुद केलेले 07 निवदेन पत्र दि. 05/10/2021.

२) श्री. भगवान ज्ञानु शिंदे व श्री. पोपट महादेव पांढरे

३) श्री. काकासो धोंडिबा जाधव

४) श्री. गणपत महादेव शिंदे

५) सौ. वर्षा जगताप शिंदे

६) श्री. सदाशिव सुखदेव पांढरे व श्री. साधु रामा पांढरे

७) 20 शेतकरी रा. चांदापुरी यांचे सही असलेले निवेदन

८) ग्रामपंचायत चांदापुरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचे पत्र क्र. 89/2021-22 दि. 05/10/2021

त्यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांवर उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकाच्या वतीने पर्यावरण सल्लागार यांनी एकत्रितरित्या उत्तर देताना सांगितले की सादरीकरण करताना यातील ब-याच मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यात सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज आहे हे सांगितलेले आहे. कारखान्यातील उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रकिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही ही अट भारत सरकारने सर्व आसवणी प्रकल्पांना घातलेली आहे असे उत्तर दिले. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हा कारखाना खाजगी आहे, त्यामुळे कुटुंबातीलच सर्वच व्यक्ती कारखान्याच्या कार्यकारिणीवर असू शकतात. कारखाना किती दिवसात चालू होईल यास पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण अनुमती व म.प्र.नि. मंडळाचे संमती पत्र प्राप्त झाल्यानंतर साधारणतः सुमारे दोन वर्षात कार्यान्वित होईल असे सांगितले. स्थानिकांना रोजगार देण्याबाबत सांगण्यात आले की नियमाप्रमाणे, स्थानिकांनाच प्रकल्पात प्राधान्य दिले जाईल. यावेळी उपस्थितांपैकी काहींनी आक्षेप नोंदविताना सांगितले की आम्ही ११ एकर जमिनी प्रकल्पांना दिल्या तर येथे कशावरुन स्थानिकांना नोक-या देतील?

धान्य माळशिरसमधूनच घेणार का यास उत्तर देताना सांगण्यात आले की जर कारखान्याला जर कच्चा माल जवळून मिळत असेल, तर कारखान्याचा खर्च वाचेल व फायदाच होणार आहे. स्थानिकांचाही फायदा होईल. ऊसाच्या दराबाबत बोलताना सांगितले की ऊसाचा दर हा बाजारभावानेच मिळणार. उपस्थितांनी इतर कारखान्यांप्रमाणे या कारखान्यातून प्रदूषण होईल याला उत्तर दिले की प्रत्येक कारखान्याची प्रदूषण नियंत्रण यंत्रणा वेगवेगळया स्वरुपाची असते. यावेळी बहुसंख्य उपस्थितांनी आम्ही प्रकल्पास विरोध करणार, साखर कारखाना उभारणार म्हणून आम्ही 1996-97 मध्ये फुकट जमिनी दिलेल्या आहेत.

बहुतांश उपस्थितांनी आम्हांला आमची शेती करू द्या, प्रकल्प नको असे विचार मांडले. काही शेतक-यांनी एक कारखाना असताना येथे दुसरा नको असे विचार मांडले. ब-याच उपस्थित शेतक-यांनी असे मत मांडले की ह्या जमिनी आम्ही नजीकच्या मे. चांदापुरी साखर कारखान्याला दिल्या होत्या, गेले २२ वर्षापूर्वी एका कारखान्यासाठी जमिनी दिल्या. एक कारखाना झाला, आता दुसरा प्रकल्प नको.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. बैठकीचे इतिवृत्त, प्राप्त झालेले सर्व आक्षेप, सूचना अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना असेही सांगितले की स्थानिकांची मागणी असल्यास त्यांना या बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डिंग, इतिवृत्ताची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल.

बैठकाची समारोप करताना अध्यक्षा, सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की स्थानिकांना उपस्थित केलेल्या सूचना, विचार किंवा आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचे सर्व व्हिडिओ रेकॉर्डिंगसुध्दा झालेले आहे. ही जनसुनावणी आहे. ज्याप्रमाणे कारखाना प्रशासनाने त्यांची बाजू सांगितली, त्याचप्रमाणे स्थानिकांचीही बाजू ऐकण्यात आलेली आहे. सदस्य, आयोजक यांना बैठकीत सांगितल्याप्रमाणे येथे कोणाताही निर्णय घेतला जात नाही. स्थानिकांच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक विचार, सूचना टीकाटिप्पणी किंवा आक्षेप यांची नोंद घेण्यात येते. ही प्रक्रिया

पूर्ण झालेली आहे.  अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी संपन्न् झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले आक्षेप व उपस्थितांची यादी जोडण्यात आलेले आहेत.

**(अजित वसंतराव पाटील)**
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ,
सोलापूर

**(शमा पवार)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर  जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर